**महाराष्ट्र शासन**

**उच्च शिक्षण संचालनालय**

**शिक्षण शुल्क समिती, मुंबई**

(राज्यातील विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित शिक्षणशास्त्र व शारिरीक शिक्षणशास्त्र महाविद्यालयांसाठी)

कार्यालयाचा पत्ता- शासकीय अध्यापक महाविद्यालय, एलफिन्स्टन तांत्रीक विद्यालय आवार,
१ ला मजला, ३ महापालिका मार्ग, धोबी तलाव, मुंबई-४०० ००१
Web:www.mahasss.in Tel-022 20824478 E-mail : jd.hesss-mh@gov.in

## शिक्षण शुल्क समितीच्या दि.३१-०१-२०२४ च्या बैठकीचे इतिवृत्त

शिक्षण शुल्क समितीची बैठक **दि.३१-०१-२०२४ रोजी दु.०२:०० वाजता** मा. अध्यक्ष, शिक्षण शुल्क समिती, मुंबई तथा मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय यांचे अध्यक्षतेखाली मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्या दालनात आयोजित करण्यात आली होती. शिक्षण शुल्क समितीच्या बैठकीस खालील सदस्य/अधिकारी उपस्थित होते.

| अ.क्र. | उपस्थित अधिकारी/ पदाधिकारी | पदनाम |
|---|---|---|
| १ | मा.श्री. विकास चंद्र रस्तोगी, मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग | अध्यक्ष |
| २ | मा.श्री. बबन माळी, उपसचिव, वित्त विभाग (मा.प्रधान सचिव, वित्त विभाग, मंत्रालय यांचे प्रतिनिधी) | सदस्य |
| ३ | डॉ. श्रीनिवास धुरे, प्राचार्य, सिडनहॅम वाणिज्य व अर्थशास्त्र महाविद्यालय, मुंबई | सदस्य |
| ४ | श्री. व्ही. बी. शर्मा- सनदी लेखापाल तथा व्ही. बी. शर्मा अॅन्ड कं. चार्टर्ड अकाऊन्टन्ट्स गोंदिया | सदस्य |
| ५ | डॉ. नलिनी पाटील-सदस्य, खाजगी शिक्षक प्रशिक्षक संघटनेचा प्रतिनिधी (शिक्षणशास्त्र) तथा प्राचार्य, एस.एन.डी.टी. कॉलेज ऑफ एज्युकेशन, पुणे | सदस्य |
| ६ | डॉ. महेश देशपांडे - खाजगी शिक्षक प्रशिक्षक संघटनेचे प्रतिनिधी (शारीरिक शिक्षणशास्त्र) तथा सहयोगी प्राध्यापक, चंद्रशेखर आगाशे शारीरिक शिक्षण महाविद्यालय, पुणे | सदस्य |
| ७ | मा. डॉ. शैलेन्द्र देवळाणकर, प्र. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे | सदस्य सचिव |
| ८ | श्री. हरिविजय शिंदे, सहसंचालक, शिक्षण शुल्क समिती, मुंबई | सदस्य |

श्री. प्रकाश बच्छाव,सहसंचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे तसेच विशेष निमंत्रित म्हणून श्री.मनोज चांडक-सनदी लेखापाल, शुल्क नियामक प्राधिकरण, वांद्रे श्री. धनाजी वासके, खर्च लेखापाल, शिक्षण शुल्क समिती, मुंबई, हे बैठकीस उपस्थित होते.

the Govern... Higher and Technical Education Department, Mantralaya, Mumbai 400 032

श्री. सुनिल सोनवणे, शिक्षणशास्त्र विषयाचे तज्ज्ञ तथा प्र.प्राचार्य, शासकीय अध्यापक महाविद्यालय, मुंबई, डॉ.राजेंद्र ढाकणे, शारीरिक शिक्षणशास्त्र विषयाचे तज्ज्ञ तथा सह.प्राध्यापक, शारीरिक शिक्षणशास्त्र महाविद्यालय, मुंबई व श्री. बबनराव तायवाडे, संस्था प्रतिनिधी, सच्चिदानंद शिक्षण संस्था, नागपूर -निमंत्रित सदस्य यांनी बैठकीस उपस्थित राहू शकत नसल्याबाबत दुरध्वनीवरून कळविले आहे.

सदर बैठकीच्या सुरूवातीस सदस्य सचिव, शिक्षण शुल्क समिती तथा संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी उपस्थितांचे स्वागत करून बैठकीच्या आयोजनाबाबतची प्रस्तावना सादर केली. सदर बैठकीत विषयपत्रिकेनुसार खालील विषयाबाबत चर्चा व निर्णय झाले.

**विषय क्र.०१:- राज्यातील शिक्षणशास्त्र व शारिरीक शिक्षणशास्त्र महाविद्यालयांकडून शेवटच्या संधीमध्ये विलंब शुल्कासह प्राप्त झालेल्या शै. वर्ष २०२१-२२ करिताच्या तज्ञांकडून तपासणी झालेल्या ०२ महाविद्यालयाच्या शुल्कास मान्यता मिळणेबाबत.**

शिक्षण शुल्क समितीच्या दि.११.०४.२०२३ च्या बैठकीत ठरल्याप्रमाणे सन २०२१-२२ ला ज्या महाविद्यालयांनी प्रस्ताव सादर केले नव्हते, अशा महाविद्यालयांना शुल्क निश्चितीकरिता प्रस्ताव सादर करण्यासाठी शेवटची संधी देण्यात आली होती. त्यामध्ये उर्वरित महाविद्यालयांपैकी ०२ महाविद्यालयांनी प्रस्ताव सादर केले होते. शिक्षण शुल्क समितीच्या नियमावलीतील मुद्दा क्र.२.१.२ Salary of Employees(Teaching &Non-teaching)is to be paid through Bank Accounts only. असे नमुद केलेले आहे. या नियमाच्या अनुषंगाने महाविद्यालयांनी वेतनावरील खर्च हा पूर्णत: बँकेमार्फत करणे आवश्यक होते. महाविद्यालयाच्या बँकेमार्फत अदा केलेल्या वेतनाच्या अनुषंगाने परिगणना करून आलेले शुल्क किंवा अंतिम मंजूर शुल्कात २० टक्के वाढ करून आलेले शुल्क यापैकी जे कमी असेल ते शुल्क मंजूर करणेबाबत निर्णय घेण्यात आला. ज्या महाविद्यालयांचे बँकेमार्फत अदा केलेल्या वेतनानूसार परिगणना करून खूप कमी शुल्क येत आहे, अशा महाविद्यालयांना रोख स्वरूपात अदा केलेल्या वेतनानूसार परिगणना करून आलेले शुल्क किंवा शासकीय महाविद्यालयातील प्रचलित दरानूसार असलेले शुल्क यापैकी जे कमी असेल ते शुल्क मंजूर करणेबाबत निर्णय घेण्यात आला.

**परिशिष्ट अ -बी.एड- ०२ महाविद्यालये**

उपरोक्त परिशिष्टात नमूद शिक्षण शुल्काबाबत महाविद्यालयांना आक्षेप असल्यास अशी महाविद्यालये योग्य त्या अभिलेख/कागदपत्रासह ८ दिवसात समितीकडे आक्षेप सादर करू शकतील.

Principal Secretary
the Government of Maharashtra
Higher and Technical Education
Department, Mantralaya, Mumbai 400 032

**विषय क्र.०२ महाविद्यालयांचे एन.सी.टी.ई. च्या सुधारित विद्यार्थी प्रवेश क्षमता आदेशानूसार शुल्क फेरनिश्चिती बाबत.**

चार महाविद्यालयांकडून एन.सी.टी.ई.चे सुधारित विद्यार्थी प्रवेश क्षमतेचे आदेश सादर केलेले आहेत. या अनुषंगाने सुधारित विद्यार्थी प्रवेश क्षमता गृहित धरून महाविद्यालयांच्या बँकेमार्फत अदा केलेल्या वेतनाच्या अनुषंगाने परिगणना करून आलेले शुल्क किंवा अंतिम मंजूर शुल्कात २० टक्के वाढ करून आलेले शुल्क यापैकी जे कमी असेल ते शुल्क मंजूर करणेबाबत निर्णय घेण्यात आला.

**परिशिष्ट-अ१-बी.एड -०२**

**परिशिष्ट-अ२-बी.एड -०२ महाविद्यालये (अल्पसंख्याक)**

उपरोक्त परिशिष्टात नमूद महाविद्यालयांपैकी स्व.गोविंदराव पाटील शिक्षण महाविद्यालय, दारव्हा, जि. यवतमाळ, सेंट्रल इंडिया कॉलेज ऑफ एज्यूकेशन, गोधणी, नागपूर व सेंट्रल इंडिया वूमन्स कॉलेज ऑफ एज्यूकेशन, गोधणी, नागपूर या महाविद्यालयांना एन.सी.टी.ई. सुधारित आदेशानूसार सदरचे सुधारित शुल्क सन २०२३-२४ पासून लागू राहील.

**विषय क्र.०३ अल्पसंख्याक महाविद्यालयांच्या महाडीबीटी पोर्टलवरील शिष्यवृत्ती शुल्क मंजूरीबाबत.**

राज्यातील अल्पसंख्याक महाविद्यालयांपैकी पडताळणी करून न घेतलेल्या २० महाविद्यालयांपैकी १० महाविद्यालयांकडून तसेच विनाअल्पसंख्यांक महाविद्यालयांच्या यादीतील अल्पसंख्याक असलेल्या ०१ अशा एकुण ११ महाविद्यालयांकडून शुल्क पडताळणीकरिता अभिलेख प्राप्त झालेले आहेत.

उपरोक्त ११ महाविद्यालयांकडून वेतनासंदर्भात महाविद्यालयांना त्रुटी कळवून त्याबाबत खुलासा मागविण्यात आला. शिक्षण शुल्क समितीच्या नियमावलीतील मुद्दा क्र.२.१.२ Salary of Employees(Teaching &Non-teaching)is to be paid through Bank Accounts only. असे नमुद केलेले आहे. या नियमाच्या अनुषंगाने महाविद्यालयांनी वेतनावरील खर्च हा पूर्णत: बँकेमार्फत करणे आवश्यक आहे. तथापि, काही महाविद्यालयांनी याचे पालन केलेले नाही. सदर महाविद्यालयांचे शुल्क निश्चितीचे अधिकार अबाधित असतानाच शिष्यवृत्तीसाठी शुल्क पडताळणी करत असताना सर्व नियमांचे पालन करणे आवश्यक आहे. काही महाविद्यालयांनी संपूर्ण वेतन रोख स्वरूपात अदा केल्यामुळे शिष्यवृत्तीसाठी शुल्काची पडताळणी करता आलेली नाही. खर्च लेखापालांकडून सदर महाविद्यालयांच्या बँकेमार्फत अदा केलेल्या वेतन खर्चानूसार परिगणना करून आलेले शुल्क किंवा अंतिम मंजूर शुल्कात २० टक्के वाढ करून आलेले शुल्क यापैकी जे कमी असेल त्या शुल्काच्या मर्यादेत महाडीबीटी पोर्टलवर प्राप्त होणाऱ्या शुल्कास मंजूरी देणेबाबत निर्णय घेण्यात आला.

**परिशिष्ट अ३ बी.एड - १० महाविद्यालये**

**परिशिष्ट अ४ एम.एड - १ महाविद्यालय**

Principal Secretary
the Government of Maharashtra
Higher and Technical Education
Department, Mantralaya, Mumbai 400 032

उपरोक्त परिशिष्टात नमुद ज्या महाविद्यालयांनी बँकेमार्फत वेतन अदा न केल्यामुळे महाविद्यालयांच्या शुल्कात घट झाली आहे अशा महाविद्यालयांनी यापुढे वेतन बँकेमार्फत अदा केले असल्यास ही महाविद्यालये पुढील वर्षी शुल्क पडताळणी करिता अभिलेख सादर करू शकतील.

उपरोक्त परिशिष्टात नमूद शिक्षण शुल्काबाबत महाविद्यालयांना आक्षेप असल्यास अशी महाविद्यालये योग्य त्या अभिलेख/कागदपत्रासह ८ दिवसात समितीकडे आक्षेप सादर करू शकतील.

**विषय क्र.०४ दि.०८.०९.२०२३ च्या बैठकीत शुल्क निश्चिती/पडताळणी झालेल्या शुल्काबाबत प्राप्त झालेल्या आक्षेपावर विचारविनिमय करणे.**

दि.०८.०९.२०२३ रोजी शुल्क निश्चिती/पडताळणी झालेल्या शुल्काबाबत ७ महाविद्यालयांनी आक्षेप सादर केलेले आहेत. (६ अल्पसंख्यांक महाविद्यालये आणि ०१ विनाअल्पसंख्यांक महाविद्यालय) या आक्षेपाबाबत समितीत चर्चा झाली. वेतन बँकेमार्फत अदा न करता रोखीने अदा केले असल्यास बँकेमार्फत अदा केलेल्या वेतनाच्या आधारे शुल्क पडताळणी/निश्चिती करणेबाबतचा निर्णय समितीच्या दि.०८.०९.२०२३ च्या बैठकीत घेण्यात आला होता. नियमानूसार महाविद्यालयांनी वेतनावरील खर्च हा पूर्णत: बँकेमार्फत करणे आवश्यक आहे. तथापि, महाविद्यालयांनी याचे पालन केलेले नाही. त्यामूळे सदर महाविद्यालयांचे पडताळणी/निश्चिती करून आलेले शुल्क हे नियमानूसार आहे.

सदर आक्षेप सादर केलेल्या महाविद्यालयाचे शुल्क हे बँकेमार्फत वेतन अदा न करता रोखीने करणे, खर्च कमी असणे किंवा NCTE ची विद्यार्थी प्रवेश क्षमता या कारणांमुळे कमी झालेले आहे. पडताळणीनंतर शुल्क कमी झाल्याची कारणे नमूद करून संबंधित महाविद्यालयांना कळविण्यात यावे. त्यानंतर या तसेच यापुढील महाविद्यालयांना अपिल दाखल करावयाचे असल्यास असे अपिल घेण्यासाठी सदस्य सचिव, शिक्षण शुल्क समिती तथा संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना प्राधिकृत करण्याचा निर्णय समितीकडून घेण्यात आला.

**परिशिष्ट अ ५ - ०७ महाविद्यालये**

**विषय क्र.०५ महाविद्यालयांना Usage Charges लागू करणेबाबत अभ्यास करण्याकरिता स्थापन करण्यात आलेल्या उपसमितीचा अहवालावर विचारविनिमय करणे व नियमावली अंतिम करणे.**

ज्याप्रमाणे शुल्क नियामक प्राधिकरण, बांद्रा यांच्याकडून Usage Charges निश्चित करून दिले जातात. त्याप्रमाणे शिक्षणशास्त्र व शारीरिक शिक्षणशास्त्र अभ्यासक्रमाच्या समितीच्या कार्यकक्षेतील महाविद्यालयांना Usage Charges देता येतील काय ? याबाबत अभ्यास करण्यासाठी शिक्षण शुल्क समितीच्या दि.०८.०९.२०२३ च्या बैठकीनूसार तसेच या कार्यालयाचे पत्र दि.१०.१०.२०२३ अन्वये उपसमिती स्थापन करण्यात आली होती. सदर उपसमितीचा अहवाल प्रस्तुत बैठकीत समितीच्या अवलोकनार्थ सादर करण्यात आला. सदर अहवाल पुढील कार्यवाहीस्तव सदस्य

Principal Secretary
the Government of Maharashtra
Higher and Technical Education
Department, Mantralaya, Mumbai 400 032

सचिव, शिक्षण शुल्क समिती, मुंबई तथा संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेमार्फत शासनास सादर करण्यात यावा, असा निर्णय झाला.

तसेच शिक्षण शुल्क समितीच्या नियमावलीस दि.०८.०९.२०२३ च्या बैठकीत तत्वत: मान्यता देण्यात आली होती. ती मान्यता कायम करत नियमावलीस मान्यता देण्यात आली.

**विषय क्र.०६ महाविद्यालयांच्या विकास शुल्कास मान्यता देणेबाबत.**

शिक्षण शुल्क समितीची दि.०५.०१.२०२२ व दि.११.०४.२०२२ च्या बैठकीतील निर्णयानुसार महाविद्यालयांकडून विकास खाते व विकास योजना मागविण्यात होत्या. यापूर्वीच्या बैठकीत शुल्क मंजूर झालेल्या एकूण ०१ महाविद्यालयाकडून तसेच प्रस्तुत बैठकीत शुल्क मंजूर होणाऱ्या २ महाविद्यालयाकडून उपरोक्त अभिलेख प्राप्त झालेले आहेत. तरी या महाविद्यालयास सन २०२२-२३ पासून १० टक्के विकास शुल्क लागू करणेबाबत निर्णय घेण्यात आला.

**परिशिष्ट अ ६ - ०३ महाविद्यालये**

पुढील वेळेस प्रस्ताव सादर करताना उपरोक्त महाविद्यालयांनी शैक्षणिक वर्षात विकास योजनांवर खर्च केल्याबाबतचा विकास शुल्काचा स्वतंत्र ताळमेळ (हिशोब) सादर करणे बंधनकारक राहील, असा निर्णय झाला. उर्वरित महाविद्यालयांनी परस्पर विकास शुल्क आकारू नये,असा निर्णय झाला.

**विषय क्र.०७ अध्यक्षांच्या परवानगीने ऐनवेळी उपस्थित होणारे विषय.**

**७.१** मराठवाडा सांस्कृतिक मंडळाचे, कॉलेज ऑफ फिजीकल एज्यूकेशन, खडकेश्वर, औरंगाबाद या महाविद्यालयातील एम.पी.एड. अभ्यासक्रम काही कारणास्तव बंद होता. सन २०२३-२४ पासून महाविद्यालयास संलग्निकरण प्राप्त झालेले आहे. सदर महाविद्यालयास शासकीय एम.पी.एड अभ्यासक्रमाचे शुल्क उपलब्ध नसल्यामुळे महाविद्यालयाच्या मागणीनूसार सन २०१७-१८ चे अंतिम मंजूर शुल्क रू.१२१००/- **प्रतिवर्ष एवढे शिक्षण शुल्क सन २०२३-२४ करिता अंतरिम शुल्क म्हणून** मंजूर करणेबाबत निर्णय घेण्यात आला. लेखापरिक्षण अहवाल तयार झाल्यावर महाविद्यालयाने शुल्क निश्चितीकरिता प्रस्ताव सादर करणे अनिवार्य राहील, त्यानूसार होणारी शुल्क निश्चिती ही अंतिम असेल.

**७.२** श्रीराम महिला शिक्षणशास्त्र महाविद्यालय (बी.एड), पानीव, ता.माळशिरस जि. सोलापूर या महाविद्यालयात सन २०१७-१८ पासून काही कारणास्तव प्रवेश बंद करण्यात आले होते. सन २०२३-२४ पासून विद्यापीठाचे संलग्निकरण प्राप्त झालेले आहे. सदर महाविद्यालयाच्या मागणीनूसार सन २०२३-२४ करिता शासकीय दरानुसार रू.१४,५९५/- प्रतिवर्ष एवढे शिक्षण शुल्क अंतरिम शुल्क म्हणून मंजूर करणेबाबत निर्णय घेण्यात आला. लेखापरिक्षण अहवाल तयार झाल्यावर महाविद्यालयाने शुल्क निश्चितीकरिता प्रस्ताव सादर करणे अनिवार्य राहील, त्यानूसार होणारी शुल्क निश्चिती ही अंतिम असेल.

Principal Secretary
the Government of Maharashtra
Higher and Technical Education
Department, Mantralaya, Mumbai 400 032

**७.३ अ.** शिक्षण शुल्क समितीच्या दि.०८.०९.२०२३ च्या बैठकीतील निर्णयानुसार सरस्वती कॉलेज ऑफ एज्युकेशन, किनवट, जि. नांदेड या महाविद्यालयाने सन २०२०-२१ मध्ये विद्यार्थ्यांकडून निर्धारित शुल्कापेक्षा अनुक्रमे १६.५२ लक्ष एवढे जास्तीचे शुल्क वसूल केल्याचे लेखापरिक्षण अहवालात दिसून आले होते. त्यानुसार सदरचे जास्तीचे शुल्क विद्यार्थ्यांना परत करून त्याचे पुरावे समितीस सादर करणेबाबत निर्णय झाला होता. त्याअनुषंगाने सरस्वती कॉलेज ऑफ एज्युकेशन, किनवट, जि. नांदेड या महाविद्यालयाने रू.१६.५२ लक्ष अतिरिक्त शुल्क विद्यार्थ्यांना परत केल्याबाबतचा अहवाल या कार्यालयास सादर केला. परंतू सदरची शुल्काची रक्कम विद्यार्थ्यांना रोख स्वरूपात अदा केल्यामुळे खातरजमा करण्यासाठी महाविद्यालयाकडून सदर शैक्षणिक वर्षातील विद्यार्थ्यांची यादी (नाव, प्रथम वर्ष/व्दितीय वर्ष, भ्रमणध्वनि क्रमांक व ईमेल आयडी) मागविण्यात यावी, असा निर्णय झाला.

**ब.** शिक्षण शुल्क समितीच्या दि.०८.०९.२०२३ च्या बैठकीतील निर्णयानुसार मुंबई बी.एड कॉलेज फॉर वूमन, वडाळा, मुंबई या महाविद्यालयाने सन २०२०-२१ मध्ये विद्यार्थ्यांकडून निर्धारित शुल्कापेक्षा अनुक्रमे ३१.३५ लक्ष एवढे जास्तीचे शुल्क वसूल केल्याचे लेखापरिक्षण अहवालात दिसून आले होते. त्यानुसार सदरचे जास्तीचे शुल्क विद्यार्थ्यांना परत करून त्याचे पुरावे समितीस सादर करणेबाबत निर्णय झाला होता. या निर्णयाच्या अनुषंगाच्या समितीचे पत्र दि.१३.१०.२०२३ अन्वये जास्तीचे विद्यार्थ्यांना परत करून केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करणेबाबत कळविले होते. त्यावर महाविद्यालयाने दि.१३.१०.२०२३ च्या पत्रान्वये अहवाल सादर करण्यात ६ महिन्यांची मुदत मागीतली आहे. सदर मुदतवाढीच्या पत्रावर सदरचे शुल्क कोणकोणत्या विद्यार्थ्यांना परत करण्यात येणार आहे त्याची यादी व कालबध्द वेळापत्रक निश्चित करून या कार्यालयास कळविणेबाबत समितीने दि.१६.१०.२०२३ च्या पत्रान्वये महाविद्यालयास कळविले होते. त्यावर महाविद्यालयाने कोणतेही उत्तर दिलेले नाही. समितीने पुन:श्च दि.०८.०१.२०२४ च्या पत्रान्वये जास्तीचे शुल्क विद्यार्थ्यांना परत करून केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करणेबाबत कळविले होते. महाविद्यालयाने त्याबाबतही कोणतेही उत्तर दिलेले नाही. यावर समितीच्या बैठकीत चर्चा झाली. त्यानुसार महाविद्यालयाने मागणी केल्याप्रमाणे सदर रक्कम परत करण्यासाठी दि.१३.१०.२०२३ पासून ६ महिने मुदत देणेबाबत समितीकडून निर्णय घेण्यात आला.

तथापि, मुंबई बी.एड कॉलेज फॉर वूमन, वडाळा, मुंबई या महाविद्यालयाने समितीच्या दि.१६.१०.२०२३ च्या पत्रात नमूद केल्याप्रमाणे सदर रक्कम कोणकोणत्या विद्यार्थ्यांना केव्हा परत करण्यात येणार आहे, त्याचे कालबध्द वेळापत्रक सादर करण्याबाबत पुन:श्च कळविण्यात यावे. महाविद्यालयाने मागीतलेल्या मुदतीत म्हणजेच दि.१५.०४.२०२४ पर्यंत विद्यार्थ्यांकडून आकारलेले ३१.३५ लक्ष एवढे जास्तीचे शुल्क विद्यार्थ्यांना परत करून त्याचा अहवाल, पुरावा समितीस सादर न केल्यास विद्यार्थ्यांकडून जास्तीचे शुल्क आकारल्याच्या कारणास्तव महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (कॅपिटेशन फी घेण्यास प्रतिबंध) अधिनियम १९८७ अंतर्गत व NCTE च्या Guidelines for

Principal Secretary
the Government of Maharashtra
Higher and Technical Education
Department, Mantralaya, Mumbai 400 032

Regulation of tuition fees and other fees २००२ नुसार कारवाई का करण्यात येवू नये, अशा आशयाची नोटीस महाविद्यालयास पाठविण्यात यावी तसेच नोटीस दिल्यानंतरही महाविद्यालयाने कार्यवाही करून अहवाल सादर न केल्यास सदस्य सचिव, शिक्षण शुल्क समिती, मुंबई तथा संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे याचेमार्फत उपरोक्त नियमांच्या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यात यावी ,असा निर्णय घेण्यात आला.

७.४ नियमामध्ये तरतुद असतानाही काही महाविद्यालये हे रोखीने वेतन अदा करत आहेत. सबब सर्वच महाविद्यालयांना नियमानूसार बँकेमार्फतच वेतन व वेतनेत्तर खर्च करणेबाबत पुन:श्च ताकिद देण्यात यावी, असे ठरले.

उपरोक्त परिशिष्टात नमूद शिक्षण शुल्काबाबत महाविद्यालयांना आक्षेप असल्यास अशी महाविद्यालये योग्य त्या अभिलेख/कागदपत्रासह ८ दिवसात समितीकडे आक्षेप सादर करू शकतील. समितीच्या पुढील बैठकीत सदर आक्षेप सादर करण्यात येतील.

सदस्य सचिव, शिक्षण शुल्क समिती तथा संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी उपस्थितांचे आभार मानले व सदर बैठक समाप्त झाली.

सदस्य सचिव,
शिक्षण शुल्क समिती
तथा
प्र.संचालक, उच्च शिक्षण, पुणे

अध्यक्ष,
शिक्षण शुल्क समिती
तथा
प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मंत्रालय, मुंबई

Principal Secretary
the Government of Maharashtra
Higher and Technical Education
Department, Mantralaya, Mumbai 400 032

परिशिष्ट अ

महाविद्यालयांना सन २०२१-२२ करिता मंजूर करण्यात आलेले शुल्क-बी.एड.

| अनु. क्रमांक | प्रस्ताव क्रमांक | महाविद्यालयाचे नाव | एकूण २ वर्षाचे शिक्षण शुल्क | शिक्षण शुल्क प्रतिवर्ष | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 78 | Keshavraj College of Education, Sonegaon, Tal.-Patoda, Dist.-Beed-414204 | 22,399 | 11,200 | संपूर्ण वेतन रोख स्वरूपात अदा केलले आहे. |
| 2 | 80 | Mahila Bahuuddeshiya Shikshan Sanstha's Shikshan Mahavidyalaya, Wardha. | 46,200 | 23,100 | १० टक्के वेतन बँकेमार्फत अदा केलले आहे. |

Principal Secretary
the Government of Maharashtra
Higher and Technical Education
Department, Mantralaya, Mumbai 400 032

एन.सी.टी.ई.च्या सुधारित आदेशानुसार महाविद्यालयांना सन २०२१-२२ करिता मंजूर करण्यात आलेले शुल्क-बी.एड.

परिशिष्ट अ१

| अनु. क्रमांक | प्रस्ताव क्रमांक | महाविद्यालयाचे नाव | एकूण २ वर्षाचे शिक्षण शुल्क | शिक्षण शुल्क प्रतिवर्ष | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 9 | Late Govindrao Patil College of Education, Darwha, Yavatmal | 37313 | 18657 | ६२ टक्के वेतन बँकेमार्फत अदा केलेले आहे. |
| 2 | 70 | Shri Balaji Adhyapak Mahavidyalaya, Jambhrun Parande, Tal& Dist.-Washim | 28844 | 14422 | ८१ टक्के वेतन बँकेमार्फत अदा केलेले आहे. |

Principal Secretary
the Government of Maharashtra
Higher and Technical Education
Department, Mantralaya, Mumbai 400 032

एन.सी.टी.ई.च्या सुधारित आदेशानुसार अल्पसंख्यांक बी.एड महाविद्यालयांचे शुल्क पडताळणी केलेल्या महाविद्यालयांची यादी सन २०२२-२३

परिशिष्ट अ२

| अ.क्र. | प्र.क्र. | महाविद्यालयाचे नाव | एकूण २ वर्षाचे शिक्षण शुल्क | शिक्षण शुल्क प्रतिवर्ष | विकास शुल्क प्रतिवर्ष | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 19 | Central India College Of Education (B.Ed.)Behind Godhani Railway Station, Godhani Rly, Nagpur | 45905 | 22952 | 2295 | |
| 2 | 23 | Central India Women'S College Of Education, Behind Godhani Railway Station, Godhani Rly, Nagpur | 45848 | 22924 | 2292 | |

Principal Secretary
the Government of Maharashtra
Higher and Technical Education
Department, Mantralaya, Mumbai 400 032

अल्पसंख्यांक बी.एड महाविद्यालयांचे शुल्क पडताळणी केलेल्या महाविद्यालयांची यादी सन २०२२-२३

परिशिष्ट अ३

| अ.क्र. | प्र.क्र. | महाविद्यालयाचे नाव | एकूण २ वर्षाचे शिक्षण शुल्क | शिक्षण शुल्क प्रतिवर्ष | विकास शुल्क प्रतिवर्ष | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 61 | Humera Khan College Of Education,Oshiwara,Jogeshwari(w), Mumbai Suburban, Andheri | 20853 | 10427 | 1042 | फक्त ४० टक्के वेतन बँकेमार्फत अदा केलेले आहे. |
| 2 | 62 | Gyanodaya B.Ed. College, Veer Savarkar Nagar Thane | 18937 | 9469 | 946 | फक्त ४३ टक्के वेतन बँकेमार्फत अदा केलेले आहे. |
| 3 | 63 | Janata Shikshan Prasarak Mandal's, Women'S College Of Education, Kharghar, Navi Mumbai , Raigad | 960 | 480 | 48 | संपूर्ण वेतन रोख स्वरूपात अदा केलले आहे. |
| 4 | 64 | The Lords Universal College of Education,Malad (East), Mumbai Suburban | 49896 | 24948 | 2494 | |
| 5 | 65 | Clara's College Of Education, Versova , Andheri -W , Mumbai | 39600 | 19800 | 1980 | |
| 6 | 66 | Oriental College of Education & Research,Andheri(w), Mumbai | 46413 | 23207 | 2320 | |
| 7 | 67 | Oriental College Of Education, Sanpada,Thane | 21256 | 10628 | 1062 | फक्त २४ टक्के वेतन बँकेमार्फत अदा केलेले आहे. |
| 8 | 68 | Kadariya College Of Education, Buldana | 15813 | 7907 | 790 | फक्त ४३ टक्के वेतन बँकेमार्फत अदा केलेले आहे. |
| 9 | 69 | Dr.Manzoor Hasan Ayyubi College Of Education, Malegaon Dist.Nasik | 576 | 288 | 28 | संपूर्ण वेतन रोख स्वरूपात अदा केलले आहे. |
| 10 | 70 | Dr.Mumtaz Ahmed Khan College of Education, Manchar, Dist-Pune | 9202 | 4601 | 460 | फक्त १८ टक्के वेतन बँकेमार्फत अदा केलेले आहे. |

Principal Secretary
the Government of Maharashtra
Higher and Technical Education
Department, Mantralaya, Mumbai 400 032

SSSMEETING DT.31.01.2024

परिशिष्ट अ४

अल्पसंख्यांक एम.एड महाविद्यालयांचे शुल्क पडताळणी केलेल्या महाविद्यालयांची यादी सन २०२२-२३

| अ.क्र. | प्र.क्र. | महाविद्यालयाचे नाव | एकूण २ वर्षांचे शिक्षण शुल्क | शिक्षण शुल्क प्रतिवर्ष | विकास शुल्क प्रतिवर्ष | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 4 | Dr.Manzoor Hasan Ayyubi College Of Education, Malegaon Dist.Nasik | 18 | 9 | 0.9 | संपूर्ण वेतन रोख स्वरूपात अदा केलले आहे. |

Principal Secretary
the Government of Maharashtra
Higher and Technical Education
Department, Mantralaya, Mumbai 400 032

आक्षेप सादर केलेल्या महाविद्यालयांची यादी परिशिष्ट अ ५

| अ. क्र. | महाविद्यालयाचे नाव |
|---|---|
| १. | पंडित राजपती मिश्रा कॉलेज ऑफ एज्युकेशन,ढोकळी, जि. ठाणे (अल्पसंख्यांक) |
| २. | मौलाना आझाद एज्युकेशन सोसायटी चे मराठवाडा कॉलेज ऑफ एज्युकेशन, औरंगाबाद (अल्पसंख्यांक) |
| ३ | गुलाम नबी आझाद कॉलेज ऑफ एज्युकेशन, पुसद, जि.यवतमाळ |
| ४ | स्व.दादाराव अडसड कॉलेज ऑफ फिजीकल एज्यूकेशन, धामणगाव रेल्वे, जि. अमरावती |
| ५ | हुदा कॉलेज ऑफ एज्युकेशन, बी.एड औरंगाबाद |
| ६ | तलत बी.एड. कॉलेज, खुलताबाद, जि.औरंगाबाद |
| ७ | मराठवाडा अध्यापक महाविद्यालय, नांदेड |

Principal Secretary
the Government of Maharashtra
Higher and Technical Education
Department, Mantralaya, Mumbai 400 032

## महाविद्यालयांना सन २०२२-२३ पासून मंजुर करावयाच्या विकास शुल्का बाबत

### परिशिष्ठ - अ ६

| अ.क्र. | महाविद्यालयाचे नाव | अभ्यासक्रम | शिक्षण शुल्क समितीने २०२१-२२ करीता मंजुर केलेले एकूण शिक्षण शुल्क | विकास शुल्क | महाविद्यालयांना मंजुर करावयाचे विकास शुल्क (१० टक्के) |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | प्रति वर्ष |
| 1 | Shri Balaji Adhyapak Mahavidyalaya Washim | B.Ed. | 28844 | 2884 | 1442 |
| 2 | Adv.N.S.Ganguwar shikshan Mahavidyalaya Gadchiroli | B.Ed. | 16706 | 1670 | 835 |
| 3 | Late Govindrao Patil college of Education Darwha | B.Ed. | 37313 | 3731 | 1865 |

Principal Secretary
the Government of Maharashtra
Higher and Technical Education
Department, Mantralaya, Mumbai 400 032

(15)

# GOVERNMENT OF MAHARASHTRA
## DIRECTORATE OF HIGHER EDUCATION, PUNE-1.
## SHIKSHAN SHULKA SAMITI(S.S.S)

APPROVED NORMS AND PROFORMAS FOR FINALISATION OF FEES FOR UNIVERSITY DEPARTMENTS/GOVERNMENT INSTITUTIONS/COLLEGES OF EDUCATION/PHYSICAL EDUCATION CONDUCTING UNAIDED AND PERMANENTLY UNAIDED, PARTIALLY UNAIDED & SELF FINANCED COURSE B.Ed.(I.T.E.P.)- B.A/B.Sc.- B.Ed./ B.ED-M.ED (Integrated), B.P.Ed, M.Ed, M.P.Ed & Special B.Ed

(Academic Year-2024-2025)

**1.0 INTERIM FEE AND FINAL FEE**

1.1 The interim fee to be collected at the time of admission in the academic year 2024-2025 (if the final fee is not approved by that time) is 5% more than the fee approved by the Samiti for the Academic Year 2021- 2022 And can be collected at the time of admission in the academic year 2024-2025 In the receipt issued to the students it is to be specifically mentioned that is only interim fee and it would be finalized by the Samiti which will be payable by the students or refundable by the college to the students as the case may be.

1.2 The interim fee is to be put up on the Notice Board of the respective colleges/Institution and is also to be displayed on the college/ institutions' website prominently. Similarly the interim is fee to be put up on the website of the SHIKSHAN SHULKA SAMITI.

1.3 The approval of final fee will be done after submission of accounts, duly audited for the financial year2022-2023 and after scrutiny of the same and the related documents such as copies of the service contract entered into by the Institute, copies of TDS Challan EPF & PT challans, salary registers, bank passbook & other relevant evidences for teaching and non- teaching staff like appointment orders, approval from university, attendance register, record of salary disbursement, copy of NCTE recognition, Affiliation of the University, certificate from the University and NCTE about compliance of NCTE norms and standards.

1.4 a) The fee for the students admitted in the current year will be computed in the prescribed format by considering the permissible expenditure as per the Norms of S.S.S. for the Academic Year 2024-25 on the basis of Audited Financial Statements of the previous financial year i.e.FY 2022-23(with increasing natural growth by 5%)

b) By increasing the fees by 20 % of last approved fees by Shikshan Shulka Samiti. (Attach an attested copy of the approved fee by Shikshan Shulka Samiti)(i.e.20 % is maximum capping of increment in last approved fees by sss)

C) The final approved fees of the current year will be the fees whichever is least of the above mentioned a) and b). However, If the committee finds that expenses incurred are as per rule, salaries of entire staff are actually paid through the bank, all teaching and non teaching staff is filled as per NCTE norms duly approved by Univerisity, then the permissible expenses incurred by the college may be considered as a base while fixing and recommending tuition fees. All rights are reserved with the committee for fixing increase/decrease in the fees.

d) Fees or the scales of fees once fixed under these regulation shall be valid for a period of three years.

e) While calculating the fee committee has considered all the expenses including Eligibility Fee,University Fee, Laboratory Fee, Library Fee, Gymkhana Fee, Information Brochure Fee, etc therefore the colleges should not collect any fee other than the Tuition Fee & Development Fee approved by S.S.S.

1.5 If the college does not approach the Samiti for approval of fee for the year 2024-2025 then it can only charge the previous approved fee by the samiti. If college/Institution has not approached to the Samiti even after three academic years after approval of fees by S.S.S. in the particular financial year then it can charge only the fees applicable to the Government and aided B.Ed, B.Ed (Integrated), B.P.Ed, M.Ed & M.P.Ed Colleges.

1.6 College / Institution should provide the details of teaching & non teaching staff as per the norms of State GOVT./ UGC / NCTE/RCI /UNIVERSITY, approvals, Reservation status their salaries, number of years they have put in their service and TDS paid etc. and whether the faculty appointed is as per norms. The institution need to submit the details along with the relevant documents such as TDS challan, P.F. and P.T. challans amount and details of payments etc. They also need to submit copies of contracts they have entered into with various service agencies such as security etc. if any. They also need to submit details of legal expenses if any that might have incurred during the said academic year, which would not be approved/allowed. The payment of salaries should be through the Electronic Transfer like NEFT/RGTS through Bank account only.



Principal Secretary
the Government of Maharashtra
Higher and Technical Education
Department, Mantralaya, Mumbai 400 032

**2.0 REVISED NORMS FOR FINAL APPROVAL OF FEES FOR STUDENTS TO BE ADMITTED IN 2024-2025 AND THEREAFTER.**

**2.1.0 SALARY EXPENDITURE WILL BE CONSIDERED AS UNDER -**

2.1.1 Salary expenditure of teaching and non- teaching staff as per norms prescribed by Regulatory authorities such as UGC, NCTE, GOVT& University and actually paid and certified by the auditor.

2.1.2 Salary of Employees (Teaching &Non- teaching) paid through Bank Accounts only will be considered for calculation of fee. salary paid in cash will be disallowed.

2.1.3 As per the court order in W.P – 1638 / 2012 Nagpur bench & Govt. .... letter No – Court matter – 2012 / Chapt No 218 / Mashi -2dt. 7th Aug 2013, the payment according to VIth pay commission pay scales are obligatory. In the proposal, actual payment as per VI pay commission or As per VII th pay commission as may be applicable should be shown

**2.2.0 NON SALARY EXPENDITURE WILL BE CONSIDERED AS UNDER-**

2.2.1 Non salary revenue expenditure duly audited will be considered. This will not include rent, interest on loans, legal charges, penalty if and any expenditure not essential or related to the conduct of courses.

2.2.2 Capping on Non Salary Expenditure ( Salary Expenditure : Non Salary, 60 % : 40% for Education courses and 50% : 50% for Physical Education courses)

2.2.3 The expenditure of the advertisements in 2 newspapers published by college/institution for the purpose mentioned below could be accounted for finalization of fees:

1. Advertisement given for appointment of teaching & non-teaching staff as required by rule.
2. Advertisement given for admissions of students to the college/institution.

In case any common advertisement is issued for many institutions then it will be required to be shared proportionately.

3.Any other Advertisement through Digital media/Hoarding/Any other Mode which are Necessary and Reasonable.

2.2.4 Hostel expenses are to be excluded. College/Institution has to state hostel expenses separately and not to be included in non-salary expenditure.

2.2.5 Two or more than two programmes are being conducted in institution /college /department/ premises /building at same campus, non salary expenses be calculated by way of computing total non salary expenses divided by number of students in the programmes. The bifurcation of the common overheads should be done in the Audited Income and Expenditure as per Accounting Standard 17: Segment Reporting issued by the Institute of Chartered Accountant of India.

**2.3.0 BASIC INFRASTRUCTURE EXPENDITURE FOR THE FOLLOWING WILL NOT CONSIDERED.**

2.3.1 The basic infrastructure in the form of building and equipment is required to be provided by The Trust/society before starting of the College/ Institute. Therefore any expenditure incurred in providing the basic infrastructure, Building & equipment etc. as per the NCTE regulations dated 28 November 2014 (see rule 6 (i), (ii).), cannot be passed on to the students. Therefore no expenditure, interest on loans taken, if any, for any purpose whatsoever, is permissible as expenditure.

**2.4.0 DEPRECIATION RATES AND THEIR CALCULATION WILL BE AS UNDER:**

2.4.1 The rates of depreciation of Assets other than building are fixed by the S.S.S. as follows

| Items | Life period | Depreciation % per year |
|---|---|---|
| Computers | Life 5 years | 20%of Cost |
| Other Equipment | Life 10 years | 10% of the Cost. |
| Furniture | Life 10 Years | 10% of the cost |
| Books | Life 10 Years | 10% of the Cost. |

It is to be noted that Depreciation on Building is not Allowable Expenditure.

2.4.2 The above depreciation rates as fixed by S.S.S. are to be applied on Straight Line basis. The assets as in the



Principal ... the Government of Maharashtra Higher and Technical Education Department, Mantralaya, Mumbai 400 032

financial year 2021-22 will be frozen as it is for the purpose of depreciation. Additional depreciation for the new assets added in the financial year 2022-2023 and thereafter will be allowed on straight line basis at the above mentioned rates. The Colleges/ Institutes are required to provide the necessary details. These depreciations are to be claimed only until the total cost is recovered, viz. for the life duration.

2.4.3 The depreciation for the assets(Other than Building) should be included in the non- salary expenditure (with details)

**2.5.0 COMPUTATION OF THE FEE BY USING THE PRESCRIBED FORMAT-**

2.5.1 The calculation of final fees will be made on the basis of sanctioned /approved strength of the college by NCTE/RCI or actual strength of students, whichever is higher.

2.5.2 The infrastructure and staff appointed is to be calculated on the basis of approved/ sanctioned strength. If the seats remain vacant, the spare faculty available on account of vacancies is of no use to the existing students and therefore such students can not be expected to bear the burden due to vacancies.

2.5.3 Where admissions are less than 80% of Sanctioned intake then 5% of total fees would be added.
Where admissions are less than 60% of Sanctioned intake then 10% of total fees would be added.
Where admissions are less than 40% of sanctioned intake, then no vacancy allowance shall be admissible.

2.5.4 All figures filled in the format of computation of fees should be supported by proper workings/Supporting.

**2.6.0 THE DEVELOPMENT FUND WILL BE AS UNDER-**

2.6.1 The Fee: - Reasonable surplus, meant for development or expansion of the College/Institution is fixed on the basis of 10% of the tuition fee

2.6.2 This development fee could be charged only if the institution has provided all the infrastructure and facilities as per norms and future development plan with proposal.

2.6.3 In Audited Financial Statements, the head of 'Development Fund' should be shown separately.

2.6.4 The development fund should be used for which it is meant for.

2.6.5 Every Institution shall maintain two separate accounts, namely the Maintenance Accounts and the Development Accounts.

**2.7.0 THE INCENTIVES FOR NAAC ACCREDITATION WILL BE AS UNDER –**

2.7.1 The College/Institution is permitted to charge additional fee for the courses accredited by the NAAC/Competent authority 15% of development fee if Accreditation is valid for which the fees are proposed.

2.7.2 This can be levied only if the accreditation is valid for major part of the academic year.

**2.8.0 THE INCENTIVE FOR THE Ph.D. FACULTIES WILL BE AS UNDER-**

2.8.1 Incentive for quality enhancement
Ph.D. Holder (if salary given by cheque as per UGC Scales)

| Sr. No. | Percentage of Total Teaching Staff | Incentive of development fee |
|---|---|---|
| i | 10% | 2% |
| ii | 20% | 5% |
| iii | 50% | 10% |

2.8.2 This incentive will be available only if such teachers are working on fulltime basis & are approved.

**2.9.0 THE INCENTIVE FOR INNOVATION, RESEARCH etc. WILL BE AS UNDER-**

2.9.1 Incentive for Patent and Publications

Principal Secretary
the Government of Maharashtra
Higher and Technical Education
Department, Mantralaya, Mumbai 400 032

| Sr. No. | Research Publication in International Journal and Patents filled by the college per faculty per year average | Incentive of development fee |
|---|---|---|
| i | 0.2 | 2% |
| ii | 0.4 | 5% |

2.9.2 This fund should be kept separately & used for research & innovation purpose only. It should be mentioned in the audit report with full report.

***All development fees work out as above will, however not exceed the statutory limit of 15%***

**2.10.0 THE COLLEGES ARE STRICTLY PROHIBITED FROM COLLECTING ANY FEE/CHARGES OTHER THAN THOSE APPROVED BY THE SSS (TUITION AND DEVELOPMENT FEES) IN CASE OF VIOLATION OF THE ABOVE NORMS FOLLOWING SERIOUS ACTION WILL BE TAKEN -**

2.10.1 Recommendation to ARA for stopping admission process of Institute.

2.10.2 Recommendation to N.C.T.E. for de-recognition .

2.10.3 The excess fees collected should be refunded to the respective students. Penalty of Minimum of 100 % to Maximum 200% of excess fees collected can be levied by S.S.S.

2.10.4 Recommendation to University for de-affiliation.

**2.11.0 BASIC INFRASTRUCTURE.**

2.11.1 The colleges/ institutions are required to provide the details of their infrastructure facilities/amenities on their website before effecting the admission of students as per the norms of N.C.T.E./RCI/UGC/GOVT/university enclosed details in the proposal.

2.11.2 The details of basic infrastructure should be shown in the proposal.

**2.12.0 COMMON SHARING**

2.12.1 The college running in the two shifts should show the details of common sharing and expenditure should be in proportion with the sanctioned strength.

2.12.2 If the college is running more courses in the same shift the details of the common expenditure should be shown separately on proportionate basis. The common sharing expenditure should be in proportion with the sanctioned strength of the courses

2.12.3 The common share should be clearly indicated with the cost, expenditure will be proportionally divided into the shared courses.

**2.13.0 BUDGET**

2.13.1 The Colleges should submit along with fee proposal, budget for next 3 year as approved by the Trustee or the Governing Council of the College. It should be signed by the Trustees.

2.13.2 The budget should be shown separately for three years.

**2.14.0 COMPUTATION OF FEES, INTERIM FEES**

2.14.1 Computation Sheet made by the college should be displayed at the notice board of the college and on web site immediately on submission of proposal.

2.14.2 The interim fees approved by S.S.S. should be displayed on the Notice board & website.

**2.15.0 FEE PROPOSAL, FINAL FEE**

2.15.1 The fee proposal submitted to the Samiti to be made available by each college in the office for perusal of the students & parents.



Principal Secretary
the Government of Maharashtra
Higher and Technical Education
Department, Mantralaya, Mumbai 400 032

2.15.2 The Final fee approved by the S.S.S. should be displayed on the Notice board & website and college should ask the students to pay the additional fee or return the excess fee to the students if the final fee becomes less than collected fee

**2.16.0 ADDITIONAL INCOME**

2.16.1 The Colleges should also state separately if any income is earned by using the college property / infrastructure and Govt. aid received if any during the year other than fees and how the income is earned

2.16.2 In the Audited Income and Expenditure Account these income should be shown head wise separately.

**2.17.0 SEPARATE PROPOSALS-**

2.17.1 The proposal for the B.Ed, B.Ed (Integrated), B.P.Ed, M.Ed, M.P.Ed, B.Ed. Special and B.Ed.-M.Ed. courses should be submitted separately.

2.17.2 The separate proposals for unaided, permanently unaided, partially unaided & self financed courses should be submitted

**2.18.0 All NOCs, permissions, approvals etc. from Govt, UGC, NCTE, RCI and UNIV should be included in the proposal.**

**2.19.1 VALIDITY OF THE FEES**

2.19.1 The fees approved by the SSS will be valid for the three academic years with effect from of sanction of the academic year.

2.19.2 The same fees should be charged for three years. After three years, new proposal should be submitted.

2.20.0 The colleges which will not submit the proposal within a prescribed time limit, they are liable to pay Rs.10000.00 per month of penalty fees decided by the SSS.

- ***B.Ed (Integrated) – Four Year B.A.- B.Ed/ B.Sc-B.Ed, Three Year B.Ed-M.Ed***

Principal Secretary
the Government of Maharashtra
Higher and Technical Education
Department, Mantralaya, Mumbai 400 032